पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/स्वयंअशाळा/ ९५ /१८
पुणे १ दिनांक :- ९/१/२०१८

प्रति,

अध्यक्ष/ सचिव/मुख्याध्यापक,
**जयमल्हार कृषि विकास प्रतिष्ठान, शिरुर, ता. शिरुर, जि. पुणे संचलित जयमल्हार प्राथमिक व उच्च प्राथमिक विद्यालय चिंचोली, ता. शिरुर, जि. पुणे**

**विषय:-** सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत.

**संदर्भ :-** १. अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय मुंबई ३२ यांचेकडील नाहरकत प्रमाणपत्र क्र. एनओसी २००८/(१५/०८)/एसई-१, दि. २०/११/२००८
२.महाराष्ट्र शासनाचे शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांच्या शासन निर्णय क्र नाहप्र-२००९/(६६३/०९)/माशि-१, दि. २० जून २०१२
३.महाराष्ट्र शासनाचे शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांच्या शासन निर्णय क्र एम्सएफएस-२०१६/प्र.क.६९/एसएम-२, दि. १७.६.२०१६
३. मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे शिउसं/प्राथ-२/स्वयअशाळा/मान्यता/पुवि/२०१६/१६८४०, दि. २७/७/२०१६

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर **नवीन शाळा स्थापना** व दर्जावाढ करण्याकरिता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र. ३ च्या शासन निर्णयानुसार नविन **शाळा स्थापन व दर्जावाढ करणेकरिता खालील अटी व शर्तीवर प्रथम मान्यता देण्यात येत आहे.**

| अ. क्र. | संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पुर्ण पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ग / इयत्ता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ९ |
| १३२ | जयमल्हार कृषि विकास प्रतिष्ठान, शिरुर, ता. शिरुर, जि. पुणे | जयमल्हार प्राथमिक व उच्च प्राथमिक विद्यालय चिंचोली, ता. शिरुर, जि. पुणे | मराठी | नवीन शाळा | प्राथमिक ते उच्च प्राथमिक | स्वयंअर्थ सहाय्यित सन २०१६-१७ |

**अटी व शर्ती**

.१. संस्थेने शाळा परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.
.२. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरीक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
.३. या अधिनियमातील तरतुदीनूसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी दिलेली आहे.
.४. संदर्भ क्रमांक ०३ अन्वये सन २०१६-१७ मध्ये परवानगी देण्यात येत आहे.
.५. परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.
.६. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहिल.
.७. शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र नवीन शाळा/वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.
.८. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
.९. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना **UDISE** मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित शाळा/ वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.

शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे

प्रत माहितीसाठी सविनय सादर-
.१. मा. अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
.२. मा. शिक्षण संचालक(माध्य.व उच्च माध्य.), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-१.
.३. मा. शिक्षण संचालक(प्राथमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-१.
.४. मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-०१
.५. गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती शिरुर